# हमीभावाशिवाय शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत

## पुण्यातील कार्यक्रमात नाम फाऊंडेशनचे संयोजक नाना पाटेकर यांचे स्पष्ट मत

प्रतिनिधी
पुणे

शेतकरी कष्ट करून आपला माल विकायला शहरात आणतो. पण, त्याच्या मालाची किंमत दुसरा कोणीतरी ठरवतो. तेव्हा त्याला केविलवाण्या नजरेने बघावे लागते. त्याला तडजोड करावी लागते. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत, असे मत अभिनेते नाना पाटेकर यांनी सोमवारी येथे व्यक्त केले.

मायविश्व टेक्नॉलॉजीतर्फे सादर करण्यात आलेल्या farmerssorg.in या मोबाईल ॲपला नाना पाटेकर यांच्या नाम स्वयंसेवी संस्थेने पाठबळ देऊ केले आहे. त्यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी माय विश्वचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर उपस्थित होते.

पाटेकर म्हणाले, शेतमालाशिवाय इतर गोष्टींना हमीभाव असतो. मग शेतमालालाच का मिळत नाही? शेतीतही अवजारे, खते, बी–बियाणे यांच्या किमती सतत वाढत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. या ॲपमुळे शेतकरी कायमचा रूजला जाणार आहे. त्यामुळे व्यापारी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील. शेतकऱ्यांना बाजारात येण्याची गरज पडणार नाही. शेतकऱ्यांचा वाहतुकीचा खर्चही कमी होईल. नाम संस्थेला वेगळे असे काही अधिष्ठान नाही. नाम संस्थेने केलेली कामे ही लोकसहभागातून केली जातात, असेही त्यांनी सांगितले.




**पुणे : मायविश्व टेक्नॉलॉजीतर्फे सादर करण्यात आलेल्या farmerssorg.in या मोबाईल ॲपचे अनावरण नाना पाटेकर यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. त्या वेळी मंदार जोगळेकर व अन्य.**

### जात नावाचा कॉलमच काढा : नाना पाटेकर

अहमदनगर येथील कर्जत तालुक्यातील कोपर्डी या गावी एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून निर्घृण खून करण्यात आल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर नाना पाटेकर यांना विचारले असता ते म्हणाले, मुलींनी प्रतिकार केलाच पाहिजे. स्वसंरक्षणासाठी केलेल्या हल्ल्याला कुठलाही कायदा विचारत नाही. जातीय वळण लागणे योग्य नाही. जात हा कॉलमच काढून टाकला पाहिजे. भारतीय ही एकच जात ठेवली पाहिजे. तरच समाज वर येईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

जोगळेकर म्हणाले, हे ॲप शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणेल. त्यातून शेतकऱ्यांची सोय होणार असून, त्यांना मोठ्या संस्था तसेच सोसायट्यांच्या गरजा समजतील. ग्राहकांनादेखील त्यांची खरेदीची यादी विक्रेत्यांसाठी पोस्ट करता येणार आहे.